# अंतिम वर्ष परीक्षेसाठी ई-मेल, मोबाईल क्रमांक अपडेटसाठी मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अंतिम वर्ष शेवटच्या सत्रातील विद्यार्थ्यांनी त्यांचा स्वत:चा ई-मेल व मोबाईल क्रमांक महाविद्यालय, अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संगणक प्रणालीमध्ये अपडेट करण्यासाठी पुन्हा ८ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय, अधिविभागात, दूरशिक्षण अभ्यास केंद्रामार्फत शिक्षण घेणाऱ्या अंतिम वर्ष अंतिम सत्रासाठी परीक्षा देणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षेच्या आयोजनाबाबत विद्यापीठाकडून यापूर्वी कळविण्यात आले आहे. त्यानुसार परीक्षेला बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचा स्वत:चा ई-मेल व मोबाईल क्रमांक अद्यावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. पोर्टलमधील लिंकमध्ये पर्याय निवडावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी केले आहे.

# कुलगुरु पदासाठी मुलाखत प्रक्रिया पूर्ण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी सोमवारी अंतिम मुलाखत प्रक्रिया पार पडली. प्रत्येक उमेदवाराची सुमारे १५ ते २० मिनीटे ऑनलाईन पद्धतीने मुलाखत घेण्यात आली. कुलपतींनी प्रत्येकाशी ऑनलाईन पद्धतीने स्वतंत्रपणे संवाद साधला. दरम्यान कुलगुरुपदी कुणाचे नाव निश्चित होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. मंगळवारी दुपारपर्यंत नव्या कुलगुरुंच्या नावाची घोषणा होण्याची शक्यता आहे.



- आज नाव जाहीर होण्याची शक्यता
- विद्यापीठ वर्तुळात उत्सुकता

तत्कालीन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या पदाचा कार्यकाल १७ जून रोजी संपला. त्यानंतर कुलपती कार्यालयाकडून त्रिसदस्यीय शोध समिती नेमली. कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर, नांदेड, बेंगलोर, जेएनयू विद्यापीठातील प्राध्यापक, प्र. कुलगुरु संशोधक अशा १६९ उमेदवारांनी अर्ज केले होते. यातून २५ उमेदवारांची निवड मुलाखतीसाठी करण्यात आली होती. या उमेदवारांपैकी ५ उमेदवारांची नावे शोध समितीकडून बंद पाकीटातून कुलपती कार्यालयाकडे दिली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, एन.एम.आय.एम. आयचे अधिष्ठाता डॉ. नितीन देसाई, प्रा. डॉ. अंजली कुरणे, प्रा.डॉ. के. व्ही. काळे, प्रा. डॉ. अविनाश कुंभार या पाच जणांची नावे अंतिम यादीमध्ये होती.

# विद्यापीठ कुलगुरू पदासाठी अंतिम मुलाखती पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी अंतिम पाच उमेदवारांच्या मुलाखतीची प्रक्रिया सोमवारी सायंकाळी पूर्ण झाली. कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी या उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखती घेतल्या. कुलगुरुपदी निवड झालेल्या अंतिम उमेदवाराचे नाव आज, मंगळवारी जाहीर होण्याची शक्यता आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, मुंबईतील नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिजचे (एनएमआयएमएस) विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. नितीन देसाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संगणक शास्त्राचे प्राध्यापक डॉ. के. व्ही. काळे, पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील मानव्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे आणि रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. अविनाश कुंभार यांच्या मुलाखती झाल्या. यापदावर कोणाची निवड होणार याची उत्सुकता विद्यापीठातील घटकांना लागली आहे.



सायंकाळी पाच ते साडेसहा या वेळेमध्ये कुलपतींनी मुलाखती घेतल्या. प्रत्येक उमेदवारांसाठी १५ ते २० मिनिटांची वेळ देण्यात आली होती. मुलाखतीमध्ये विद्यापीठाच्या विकासाचे व्हीजन, भविष्यकालीन योजना, कार्यक्षेत्राची माहिती, आदींबाबत कुलपतींनी या उमेदवारांशी संवाद साधल्याची प्रतिक्रिया उमेदवारांनी दिल्या.

# कुलगुरूपदासाठी मुलाखती पूर्ण

## ▪ आज होणार अंतिम निवड



कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू निवड प्रक्रियेचा अंतिम टप्पा आज पूर्ण झाला. यामध्ये कुलपतींनी आज अंतिम यादीमधील पाचही उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. उद्या (ता. ६) कुलगुरुपदी एका उमेदवाराची निवड केली जाईल, अशी माहिती कुलपती कार्यालयाकडून देण्यात आली.

विद्यापीठाच्या कुलगुरू पदाची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. १६९ अर्जांच्या छाननीपासून सुरू झालेल्या या प्रक्रियेचा शेवटचा टप्पा आज पार पडला. संध्याकाळी कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नितीन देसाई, डॉ. कारभारी काळे, डॉ. अविनाश कुंभार आणि डॉ. अंजली कुरणे यांच्या ऑनलाईन मुलाखती घेतल्या. प्रत्येक उमेदवाराला १५ ते २० मिनिटांचा वेळ देण्यात आला होता. उद्या (ता. ६) दुपारपर्यंत अधिकृत नावाची घोषणा होईल, असे कुलपती कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. अंतिम पाच उमेदवारांचा अल्पपरिचय पुढीलप्रमाणे.

### प्रभारी कुलगुरू म्हणून काम



डॉ. कारभारी काळे औरंगाबाद जिल्ह्यातील. सालुखेडा हे काळे यांचे मूळ गाव आहे. त्यांनी इंजिनिअरींग टेक्नॉलॉजीमध्ये एमएस्सी पीएच.डी. केली असून सध्या ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात वरिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

### २८ वर्षांचा अनुभव



डॉ. नितीन देसाई यांचे गडहिंग्लज तालुक्यातील तळेवाडी हे मूळ गाव आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून वनस्पतीशास्त्र विषयात एमस्सी, पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण घेतले असून सध्या ते मुंबईमधील नरसी मोनजी इस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमध्ये विज्ञान शाखेचे आधिष्ठाता आहेत.

### केंद्राचे संचालक



डॉ. अविनाश कुंभार मूळचे सांगली जिल्ह्यातील इस्लामपूरचे आहेत. त्यांनी रसायनशास्त्रात एम.एस्सी, पीएच.डी. केली आहे. सध्या ते पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्राध्यापक आहेत. ते पूर्वी रसायनशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष होते. अद्ययावत उपकरण केंद्राचे संचालक होते.

### कुलसचिव म्हणून काम



डॉ. दिगंबर शिर्के यांचे मूळ गाव हातकणंगले तालुक्यातील वाठार तर्फ वडगाव आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून संख्याशास्त्र विभागात एमएस्सी, एम.फील, पीएच.डी. केली आहे. विभागप्रमुख, कुलसचिव, प्र-कुलगुरू या पदावर त्यांनी काम केले असून त्यांना शिक्षण क्षेत्रातील ३३ वर्षांचा अनुभव आहे.

### पुणे विद्यापीठात कार्यरत



डॉ. अंजली कुरणे येथील शिवाजी पेठेतील असून सध्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मानवशास्त्र शाखेच्या अधिष्ठाता म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी प्राणिशास्त्र विषयात बी.एस्सी. केले असून मानवशास्त्र विषयात एम.एस्सी. आणि पीएच.डी. केली आहे.

# कुलगुरू पदासाठी मुलाखत प्रक्रिया पूर्ण

## राज्यपालांनी साधला ऑनलाईन संवाद; नावाची उत्सुकता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजीविद्यापीठकुलगुरुपदाच्या निवड प्रक्रियेंतर्गत शोध समितीकडून पाठविण्यात आलेल्या अंतिम पाच पात्र उमेदवारांच्या सोमवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी ऑनलाईन मुलाखती घेतल्या.

त्रिसदस्यीय कुलगुरू निवड शोध समितीने सप्टेंबरअखेर व्ही. सी. द्वारे २५ उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यामधून पात्र पाच जणांची नावे निश्चित करण्यात आली. सोमवारी सायंकाळी पाचनंतर राज्यपालांकडून मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के,




मुंबईतील नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमधील विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. नितीन देसाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभागातील वरिष्ठ प्रा. डॉ. कारभारी काळे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात प्रा. डॉ. अविनाश कुंभार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानव विद्याशाखेच्या अधिष्ठता डॉ. अंजली कुरणे या उमेदवारांचा समावेश आहे.

राज्यपालांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिगद्वारे उमेदवारांशी १५ ते २० मिनिटे ऑनलाईन संवाद साधला. यात विद्यापीठाचा विकास, भविष्यकाळात राबविण्यात येणारी ध्येय-धोरणे, शैक्षणिक योगदान, विद्यापीठास त्याचा होणारा फायदा याबद्दल चर्चा केली. शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडते, याकडे विद्यापीठ वर्तुळासह शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागून राहिले आहे.

# विद्यापीठातर्फे नेट, सेट राष्ट्रीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाच्या वतीने नेट, सेट परीक्षेसंदर्भात राष्ट्रीय ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत नेट, सेट पेपर-१ चे महत्त्व, शैक्षणिक तंत्रज्ञान, उच्चशिक्षण तंत्र, संशोधन पद्धती, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान व तार्किक, गणितीय तर्क अशा महत्त्वाच्या घटकांवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेसाठी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान, कर्नाटक, तामिळनाडू, गोवा, आसाम, पश्चिम बंगाल, ओरिसा राज्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेमध्ये डॉ. गजानन राशीनकर, डॉ. के. बी. पाटील, डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. मीनल ओक, प्रा. प्रशांत कल्लोळी, डॉ. संतोष देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.

# नेट- सेट पेपर एकसाठी विद्यापीठातर्फे कार्यशाळा



उजळाईवाडी, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाने नेट/सेट पेपर एकसाठी राष्ट्रीय ऑनलाईन कार्यशाळा झाली. कार्यशाळेत 'नेट/सेट पेपर एक'चे महत्व, शैक्षणिक तंत्रज्ञान, उच्चशिक्षण तंत्र, संशोधन पद्धती, माहिती, संदेशवहन तंत्रज्ञान, तार्किक, गणितीय तर्क अशा घटकांवर तज्ज्ञ शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्यवक डॉ. गजानन राशीनकर यांनी नेट/सेट उत्तीर्ण होण्यासाठी पेपर 'एक'चे महत्त्व, त्या विषयात जास्त गुण मिळवता येतील याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. के. बी. पाटील यांनी विविध शैक्षणिक पद्धती, वैशिष्ट्यांवर माहिती दिली. डॉ. व्ही. एस. खंडागळे यांनी उच्च शिक्षण, विविध आयोग, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या घटकांवर प्रकाश टाकला. डॉ. मीनल ओक यांनी संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धतीची माहिती दिली. प्रा. प्रशांत कल्लोळी यांनी माहिती, संदेशवहन तंत्रज्ञान यामधील अद्ययावत माहिती विद्यार्थ्यांना दिली. डॉ. संतोष देशपांडे यांनी तार्किक, गणितीय तर्क यावर आधारित प्रश्न सोप्या पद्धतीने कसे सोडवावे, हे सांगितले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, रसायनशात्र विभागप्रमुख, कॉम्प्युटर विभागाच्या संचालिका स्वाती खराडे, नेटवर्क प्रशासक कल्याण देवरुखकर, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट ऑफिसर प्रमोद समुद्रे यांनी परिश्रम घेतले.